Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-4 | Issue- 7 | Jan-2015

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी उपक्रमांची निर्मीती रणे आणि राबविलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासणे.

**सीमा एल. बर्गट**

सहा. प्राध्यापकगुणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय पुसद, जि यवतमाळ.

**सारांश** - एकविसाव्या शतकात विविध शोध लागून ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. आज जगात मानवाच्या सेवेसाठी विविध भौतिक साधने उपलब्ध आहेत. मानवाला अशक्य असे जगात काहीही नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एवढी नेत्रदिपक प्रगती मानवाने केलेली आहे. परंतू त्यामध्ये मानवाचे जीवन अधिकच असुरक्षित झाले आहे. कारण प्राप्त केलेल्या शक्ती सामर्थ्याबरोबर त्यांच्याशी सुसंगत अशी मानवता जपणारी मूल्ये मात्र जोपासली गेली नाही. म्हणून मूल्यांची रूजवणूक करणे, जपणूक करणे मप्राप्त असल्याने मानवी जीवनमूल्यांचा विकास शिक्षण व्यवहारातून अधिक परिणामकारकतेने होऊ शकेल असा विश्वास वाटतो.

## प्रस्तावना-

शालेय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या शालेय आणि सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून हे साध्य करता येईल. यासाठी व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र या घटकांशी सर्व स्तरातील विद्यार्थ्यांचा परस्पर संबंध प्रस्थापित करावा लागेल. यातून त्यांच्यामध्ये मूल्यांच्या संदर्भातील जाणीवांचा विकास होवून तो हा विकास जोपासला जाईल. यासाठी अभ्यासक्रमामध्ये ालील दहा मूल्यांचा गाभाभूत घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. शालेय स्तरावर अध्ययन अध्यापन करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या विविध विषयामध्ये दिलेल्या आशयाच्या माध्यमातून आणि सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून आम्हाला विद्यार्थ्यामध्ये विविध मूल्यांची रूजवणूक करावयाची आहे आणि आपल्या देशासाठी एक सशक्त सुजाण पिढी घडवायची आहे. तसेच, एक भारतीय नागरीक म्हणून समाजाचेही काही देणे लागते ही सामाजिक राष्ट्रीय बांधीलकी निर्माण व्हावी यासाठी विविध अध्ययन अनुभव देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु शाळेमध्ये

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या विचारामध्ये आम्हाला मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून येते, ज्या प्रमाणे त्यांचे विचार आहेत त्या विचारांचे प्रतिबिंब त्याच्या आचरणामध्ये दिसून येत नाही. अशा स्थितीत सैध्दांतिक स्तरावर देण्यात आलेले मूल्यशिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांच्या आचरणामध्ये रोजच्या व्यवहारामध्ये त्यांचे प्रतिबिंब दिसणे अपेक्षित आहे. तरच शाळा या राष्ट्रीय विकासाच्या केंद्राच्या माध्यमातून अपेक्षित भारतीय व्यक्ती आणि राष्ट्रीय मूल्याधिष्ठीत समाजाची निर्मीती होऊ शकेल. यासंदर्भात वस्तुस्थितीचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आणि जर विद्यार्थ्यांच्या विचारांमध्ये मूल्य विकसित झाल्याचे दिसून येत असतील, त्यांच्या वर्तनामध्ये अपेक्षित मूल्याधिष्ठीत परिवर्तने दिसत नसतील तर या विद्यार्थ्यांमध्ये खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या माध्यमातून अपेक्षित असलेले मूल्य विकसित झाले आहेत असे म्हणता येणार नाही. वरील बाबीचा विचार करता प्रस्तुत समस्येवर संशोधन कार्य करणे आवश्यक आहे.

## २. संशोधनाचे महत्व व आवश्यकता :-

आजच्या आधुनिक जगात मानवाला अशक्य असे काही नाही एवढी नेत्रदिपक प्रगती मानवाने केली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. परंतु वर्तमान समाजात प्रचंड गतीने मूल्यांचा ऱ्हास होत आहे. मानव प्रगतीच्या आधारावर अंतराळात वस्ती करण्याचे स्वप्न पाहतो पण स्वतःची कुटुंब रचना मोडकळीस येत आहे. माणूस मानसापासून दुर जात आहे. प्रत्येक शहरात वृध्दाश्रम उदयास येत आहे हे निश्चितच प्रगतीचे लक्षण नाही.

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सत्प्रवृत्ती वाढीस लागावी, सदगुणांचा परिपोष व्हावा विद्यार्थ्यांचे वर्तन चरित्र आणि क्षमता याबाबत नैतिक संस्कार केले जावेत राष्ट्रीय ऐक्य आणि मानव जातीच्या कल्याणासाठीच मूल्यशिक्षणाची आवश्यक्ता अभ्यासक्रमामध्ये प्रतिपादित केलेली आहे. पूर्वी शैक्षणिक तत्वज्ञानात चरित्र घडणीला महत्व दिले जात असे तसेच याचा चांगला सरावही करून घेतल्या जात असे पण या उदिद्ष्टांची चाचणी कोठेही होत नसे त्यामुळे परिक्षार्थी विद्यार्थी परिक्षामध्ये उत्तम रीतीने यशस्वी होत असे व सुशिक्षित माणून समाजात वावरत असे परंतु या शैक्षणिक प्रक्रियेत यशस्वी ठरलेले असंख्य विद्यार्थी आजच्या प्रचलित शिक्षण पध्दतीतून प्रचंड संख्येने बाहेर पडत आहे. पण मानवतेच्या मूल्यांची योग्य जोपासणा न होता चारित्र्यांची घडण न होता सुशिक्षित झाल्यामूळे मानवानेच निर्माण केलेल्या वेगवेगळ्या शक्ती मानवाविरूध्द वापरल्या जाऊन त्या मानवाच्या व मानवतेचा ऱ्हास करतांना दिसत आहेत. म्हणूनच मूल्य शिक्षणाच्या माध्यमातून माणसाला माणूस बनविणारे शिक्षण मिळायला पाहिजे काही शतकापूर्वीच स्वामी विवेकानंद यांनी सांगीतले की, जीवन घडविणारे माणूस निर्माण करणारे, चरित्र घडविणारे व चांगले विचार आत्मसात करायला लावणारे शिक्षण आपल्याला हवे आहे ही गोष्ट आजही तितकीच खरी आहे.

मूल्यांच्या जोपासनेसाठी आरंभ लहानपणीच व्हावा हे मूल्यसंस्कार मुलांवर शिक्षणातून घडावयास हवेत स्व विषयक समाजविषयक, राष्ट्रविषयक, विश्वविषयक आणि वर्तमान संस्कृती विषयक सर्व मूल्यांची जोपासना शालेय जीवनात विद्यार्थ्यामध्ये व्हायला हवी विविध उपक्रमाव्दारे हे साध्य करता येईल.

**३. संशोधन समस्या - "प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी उपक्रमांची निर्मीती करणे आणि राबविलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासणे."**

**४. संशोधन समस्येतील संज्ञाच्या व्याख्या** - प्रस्तुत संशोधनाच्या समस्येतील सज्ञांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आल्या आहेत.

**विद्यार्थी :-** प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी म्हणजे गुणवंतराव देशमुख विद्यालय पुसद या शाळेमधील इयत्ता ५ ते ७ मध्ये अध्ययन करणारी मुले व मुली म्हणजे विद्यार्थी होय.

**नैतिक मूल्य :-** शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये इष्ट दिशेने अनुकूल बदल व्हावा यासाठी वर्गनिहाय निर्धारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून आणि सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत व बाह्यवर्तनामध्ये घडून येणारा अपेक्षित वर्तन बदल जो की, आमच्या दहा गाभाभूत घटकांमध्ये समाविष्ट आहे आणि शाळा या राष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून तो विकसित करण्यासाठी औपचारीक प्रयत्न करण्यात येतात त्याला प्रस्तुत संशोधनामध्ये मूल्य शिक्षण म्हणून संबोधण्यात आले आहे.

**५. संशोधनाची उदिद्ष्टे -** प्रस्तुत संशोधनाची उदिद्ष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या नैतिक मूल्यांचा शोध घेणे.

२. विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये दिसून येणाऱ्या नैतिक मूल्याचा शोध घेणे.

३. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्यांचा विकास करण्यासाठी उपक्रम राबवि.

४. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबलिलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासणे.

**६. संशोधनाच्या परिकल्पना** - प्रस्तुत संशोधनाच्या परिकल्पना पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात आल्या आहेत.

१. प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या राबविलेल्या उपक्रमामुळे नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत होईल.

२. विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांच्या संदर्भात असलेल्या विचारांमध्ये आणि वर्तनामध्ये राबविलेल्या उपक्रमामुळे एकवाक्यता स्थापित होण्यास मदत होईल.

३. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांच्या विकासामध्ये राबविलेल्या उपक्रमाची परिणामकारकता अधिक असेल.

**७. संशोधनाच्या मर्यादा आणि व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा आणि व्याप्ती पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

१. प्रस्तुत संशोधन प्राथमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन □ार्य शै□ि□□ सत्र २०१४-२०१५ या सत्रामधील विद्यार्थ्यांपूरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

४. नैतिक मूल्य हे विद्यार्थ्यांच्या विचारामध्ये आचरणामध्ये यावेत त्यांच्यामध्ये समन्वय असावा या बाबी विचार घेऊन उपक्रमांची निर्मीतीचा उपक्रमांची निर्मीती करण्यात आली आहे.

**८. संशोधन पध्दती** - प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर □रण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्राथमिक स्तरावर अध्ययन करीत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्याच्या संदर्भात त्यांची स्थिती जाणून घेण्यात आली. या विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये आणि विचारांमध्ये नैतिक मूल्याचा विकास व्हावा यासाठी उपक्रमांची योजना तयार करण्यात आली आणि त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नैति□ मूल्यांचे विविध धडे देण्यात आले. अंतिमतः या राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तन व्यवहारामध्ये त्यांच्या आचरणामध्ये कोणता बदल घडून आला. त्यांच्या विचारांमध्ये नैतिक मूल्यांचा किती प्रमाणात विकास झाला याचा शोध घेण्यात आला तसेच नैतिक मूल्यांनी युक्त विचार आणि वर्तन यामध्ये समन्वय प्रस्तापित होण्यास मदत झाली का तात्पर्य विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता प्रायोगिक पध्दतीच्या माध्यमातून तपासण्यात आली आहे.

**९. संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श** - प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक स्तरावर शिकणारे सर्व विद्यार्थी हे प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. त्यापैकी २० विद्यार्थी जे प्राथमिक स्तरावर अध्ययन करीत आहेत त्यांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आली आहे.

**१०. संशोधनाची साधने** - प्रस्तुत संशोधनाकरीता नैतिक मूल्य चाचणीचा वापर करण्यात आला आहे.

**११. उपक्रमांची निश्चिती आणि कार्यान्वयन-** प्रस्तुत संशोधनाकरीता विद्यार्थ्यामध्ये वैयक्तिक नैतिक मूल्य, पारिवारिक नैतिक मूल्य, राष्ट्रीय नैतिक मूल्य, आणि वैश्विक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी पुढील उपक्रमांचे निर्धारण करण्यात आले आहे.

**उपक्रम १ -** नैतिक मूल्यावर आधारित चलचित्रांचे प्रदर्शन.

**उपक्रम २ -** नैतिक मूल्यावर आधारित प्रसंगाचे प्रस्तुतीकरण.

**उपक्रम ३ -** नैतिकतेच्या अभावाचे दृष्परिणामावर आधारित चलचित्रपट.

**उपक्रम ४ -** नैतिक मूल्यावर आधारित बोधकथांचे प्रस्तुतीकरण.

**उपक्रम ५ -** सर्वेक्षण व भेटी-अंपग शाळेला भेट, वृध्दाश्रमाला भेट, झोपडपट्यांना भेट इत्यादी.

**१२. माहितीचे विश्लेषण** - प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, प्रतिशत प्रमाण, 'टी' परिक्षण आणि आलेख व रेखाचित्राचा वापर करण्यात आला आहे.

**सार□ी □ १**

**प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये पूर्व आणि उत्तर चाचणीमध्ये विकसित नैतिक मूल्यामधील सार्थक अंतर दर्शव□ारी सार□ी.**

| चल | पूर्व आणि उत्तर चाचणी | मध्यमा-न | सं□या | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | टी मूल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नैतिक मूल्य | पूर्व चाचणी | ४९.७०० | २० | २१.७७६ | १९ | १०.४४० | सार्थक आहे |
| | उत्तर चाचणी | ७७.१५० | २० | १९.५०५ | | | |

**आलेख क्र १**

**प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये पूर्व आणि उत्तर चाचणीमध्ये विकसित नैतिक मूल्यामधील सार्थक अंतर दर्शवणारे रेखाचित्र.**




**अर्थनिर्वचन :-** वरील सार□ी □ २ वरुन स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या नैतिक मूल्यांच्या संदर्भात पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणीच्या सहाय्याने प्राप्त माहीतीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये उपक्रम राबविण्यापूर्वी असलेल्या नैतिक मुल्यांच्या पूर्व चाचणीचे मध्यमान ४९.७०० आहे आणि प्रमाण विचलन २१.०७७६ आहे. तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांमध्ये झालेला बदल पाहण्यासाठी उत्तर चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांचे प्रमाणाचे मध्यमान ७७.१५० आहे आणि प्रमाण विचलन १९.५०५ आहे. स्वाधिनता मात्रा १९ करिता ०.०१ सार्थकता स्तरावर असलेल्या सारणी मूल्यापेक्षा गणना व्दारा प्राप्त टी मूल्य १०.४४० अधिक आहे. याचा अर्थ असा की, विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांच्या संदर्भात उत्तर चाचणीमधील मध्यमानाचे प्रमाण हे पूर्व चाचणीतील मध्यमानापेक्षा अधिक आहे. म्हणजे विद्यार्थ्यामध्ये

नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये हे नैतिक मूल्य वृध्दींगत होण्यास मदत झाल्याचे दिसून येते.

**नि□र्ष**-विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

**१३. संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष** :- प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढण्यात येत आहेत.

१. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे उत्तर चाचणी मध्ये उत□ष्ट प्रमाणात नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट झाले आहेत. तर पूर्व चाचणीमध्ये जे विद्यार्थी सामान्य, निम्न, अतिनिम्न या नैतिक मूल्यांच्या वर्गांतरांतर्गत समाविष्ट होते. त्यापैकी अधिकांश विद्यार्थी वरच्या नैतिक स्तरावर येण्यास नैतिक मूल्यांच्या संदर्भात राबविण्यात आलेल्या उपक्रमामूळे मदत झाली आहे.

२. विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

३. विद्यार्थ्यामध्ये वैयक्तिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे पूर्व चाचणीच्या तुलनेत उत्तर चाचणी मध्ये उत्कृष्ट आणि चांगल्या प्रमाणात वैयक्तिक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट आहेत तर सामान्य निम्न आणि अतिनिम्न वैयक्तिक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत पूर्व चाचणीमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यावरुन स्पष्ट होते की, राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक नैतिक मूल्य विकसित होण्यास मदत होते.

४. विद्यार्थ्यामध्ये वैयक्तिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील वैयक्तिक नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

५. विद्यार्थ्यामध्ये पारिवारिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे पूर्व चाचणीच्या तुलनेत उत्तर चाचणी मध्ये उत्कृष्ट आणि चांगल्या प्रमाणात पारिवारिक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट आहेत तर सामान्य निम्न आणि अतिनिम्न पारिवारिक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत पूर्व चाचणीमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यावरुन स्पष्ट होते की, राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये पारिवारिक नैतिक मूल्य विकसित होण्यास मदत होते.

६. विद्यार्थ्यामध्ये पारिवारिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील पारिवारिक नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

७. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे पूर्व चाचणीच्या तुलनेत उत्तर चाचणी मध्ये उत्कृष्ट आणि चांगल्या प्रमाणात सामाजिक नैतिक मूल्य या वर्गातराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट आहेत तर सामान्य निम्न आणि अतिनिम्न सामाजिक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत पूर्व चाचणीमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यावरुन स्पष्ट होते की, राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये सामाजिक नैतिक मूल्य विकसित होण्यास मदत होते.

८. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील सामाजिक नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

९. विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे पूर्व चाचणीच्या तुलनेत उत्तर चाचणी मध्ये उत्कृष्ट प्रमाणात राष्ट्रीय नैतिक मूल्य या वर्गातराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट आहेत तर सामान्य निम्न आणि अतिनिम्न राष्ट्रीय नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत पूर्व चाचणीमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यावरुन स्पष्ट होते की, राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय नैतिक मूल्य विकसित होण्यास मदत होते.

१०. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील राष्ट्रीय नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

११. विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे पूर्व चाचणीच्या तुलनेत उत्तर चाचणी मध्ये उत्कृष्ट चांगल्या प्रमाणात वैश्विक नैतिक मूल्य या वर्गातराच्या अंतर्गत सर्वाधिक विद्यार्थी समाविष्ट आहेत तर सामान्य निम्न आणि अतिनिम्न वैश्विक नैतिक मूल्य या वर्गांतराच्या अंतर्गत पूर्व चाचणीमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यावरुन स्पष्ट होते की, राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये वैश्विक नैतिक मूल्य विकसित होण्यास मदत होते.

१२. विद्यार्थ्यामध्ये वैश्विक नैतिक मूल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामधील वैश्विक नैतिक मूल्यांचा विकास होण्यास मदत झाली.

**संदर्भ □थ.**

१) अहेर, हिरा. (१९९५). *उद्योन्मुख समाजातील शिक्षण व शिक्षक.* -ना□पूर: विद्या प्र□ाश-न.

२) अहेर, हिरा.(१९९५).*उद्योन्मुख समाजातील शिक्षण व शिक्षक.* -ना□पूर: विद्या प्र□ाश-न.

३) □ुडले, म.बा. (१९९६). *शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र*. पु□: श्रीविद्या प्र□ाश-न.

४) उपासनी, ना.के. आणि □ळ□□ी □.व्ही. (१९८७). *यशस्वी अध्यापन*.पु□: श्री विद्या प्र□ाश-न.

५) जाधव,मोहन, भोसले,आरती आणि सरपोतदार, प्राची. (२००४). *माध्यमि□ शि□□*. □ोल्हापूर: फडके प्रकाशन.

६) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. (२००९). *मराठी*

*बालभारती इयत्ता ८ वी*. मुंबई : पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ.

७) मुळावकर, संतोष आणि मुळावकर, कल्पना. (२००५). *मूल्यशि□□: सुसंवाद*. -ना□पूर: विद्या प्र□ाश-न.

८) □ावंडे, इ.एन आणि झोंबाडे, वर्षा. (२०००). *मूल्याधिष्ठीत शिक्षण प्रक्रिया आणि उपचार*. अमरावती: ि-र्मल प्र□ाश-न.

**सीमा एल. बर्गट**
सहा. प्राध्यापकगुणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय पुसद, जि यवतमाळ.